जा. क्र. 6367/2017

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

05 DEC 2017

परिपत्रक क्र. ५२२ दिनांक ०५/१२/२०१७

या अधिकारणीच्या असे निदर्शनास आले आहे की, एखाद्या व्यक्तीची अथवा व्यक्तींची विश्वस्त म्हणून कालावधी संपल्यानंतरही सदरील व्यक्ती या न्यासाच्या मालमत्तेवर अथवा न्यासाच्या जमिनीच्या सात-बारा उताऱ्यावर स्वत:चे नाव स्वत:हुन कमी करीत नाहीत. वास्तविकत: विश्वस्तांची निवड ही ठराविक कालावधीकरीता असल्यामुळे व विश्वस्तांचे काम हे केवळ न्यासाच्या मालमत्तेची देखभाल करण्याचे अथवा काळजी घेण्याचे असल्यामुळे विश्वस्तांना त्यांची नावे न्यासाच्या मालमत्तेवर अथवा सात-बारा उताऱ्यावर विश्वस्तांचा कालावधी संपल्यानंतरही त्यांची नावे न्यासाच्या मालमत्तेवर असल्यास ते त्याचा दुरुपयोग करुन न्यासाच्या मालमत्तेबाबत व्यवहार करु शकतात, यामुळे न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे धर्मादाय संघटनेतील सर्व अधिकाऱ्यांना असे आदेशित करण्यात येते की, आपण संबंधित तलाठी, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी यांना विश्वस्तांची नावे संबंधित न्यासाच्या मालमत्तेवर नोंदविते वेळी संबंधित विश्वस्तांचा कालावधी स्पष्टपणे नमूद करण्यात यावा यासाठी पत्रे द्यावीत व ज्या विश्वस्तांनी अनधिकृतपणे स्वत:ची नावे न्यासाच्या मालमत्तेवर लावलेली आहेत त्यांची नावे रद्द करण्याची प्रक्रिया चालू करावी.

5.12.17

(शि.ग.डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)